# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.२२०८५९/२२/त.क्र.११०/२५/०१

**श्रीमती राणी विष्णू गवळी**
सी.जी.एस. कॉलनी,
सेक्टर ७, बि.नं. ५१,
रुम नं. २०४३, अॅन्टापहिल,
मुंबई-४०००३७

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक**
बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण निरीक्षक यांचे कार्यालय
दक्षिण विभाग, ईविटा इम्प्रेस इमारत, १ला मजला, ग.द. आंबेडकर मार्ग,
परेल, मुंबई – ४०००१२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक**
बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण निरीक्षक यांचे कार्यालय
दक्षिण विभाग, ईविटा इम्प्रेस इमारत, १ला मजला, ग.द. आंबेडकर मार्ग,
परेल, मुंबई – ४०००१२.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ११.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.११.११.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, श्री. प्र. गो. महाबोले व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक, श्रीमती वैशाली वीर उपस्थित आहेत.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आज झालेल्या तक्रार अर्जाच्या सुनावणीत तक्रारदार श्रीमती राणी गवळी यांनी अपील क्र.८६/२२/०१ यात दि.१२.०५.२०२२ रोजी दिलेला अंतीम आदेशनंतर प्रदान करण्यात आलेले कागदपत्रे हे खोटे व बनावटी असून यावर कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे. यावर विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षक निरीक्षक यांनी खालील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे:

अपीलकर्त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(१) अन्वये दि.१९.०६.२०१८ रोजी जन माहिती अधिकारी प्रस्तुत कार्यालय यांचेकडे माहितीची मागणी केली होती.

दि.१३.०५.२०१९ रोजी अपीलकर्त्याने मा. आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. प्रस्तुत माहिती अपीलकर्ता त्यांच्या वैयक्तिक मान्यताबाबत विचारणा करत असल्याचे दिसून येते.

दि.१२.०५.२०२२ रोजी मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या आदेशानुसार अपीलकर्ता शिक्षिका यांच्या नेमणूकविषयी संबंधिचा चौकशी अहवाल दि.०६.०४.२०२२ ची प्रत अपीलकर्ता यांना समक्ष देण्यात आली असल्याने अपील निकाली काढण्यात आले होते.

तथापि, दि.१५.०६.२०२२ रोजी अपीलकर्त्यांने आपणाकडे अर्ज सादर करून चुकीची कागदपत्रे देण्यात आली असल्याचे व अपीलकर्त्यास सदर कागदपत्रे मान्य नसल्याचे नमूद केलेले आहे. तसेच खोटी कागदपत्रे बनवून दिली असल्याचे तक्रार अर्जात नमूद केले आहे. तक्रारीचा पुर्नविचार करण्याबाबतही विनंती केली होती.

सदर विनंतीच्या अनुषंगाने संदर्भिय नोटीस या कार्यालयास दि.१०.११.२०२५ रोजी १६.१० मिनिटांनी प्राप्त झाली असून नोटीसीत नमूद प्रमाणे सर्व सुचनांचे पालन करणेसाटी पुरेसा कालावधी व वेळ उपलब्ध नाही. तक्रार दार यांनी त्यांच्या व्हाटस्अॅप/ ई-मेल आयडी दिलेला नाही.

संबंधित अपीलकर्त्यांनी आक्षेप सुमारे एक महिन्यानंतर घेतल्याचे दिसून येत. याबाबतची कोणतीही पूर्वसुचना या कार्यालयास न देता थेट आपणाकडे अर्ज दाखल केला आहे. हे कार्यालय शाळा व्यवस्थापनाने रितसर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती नियमानुसार केली आहे किंवा कसे? याची खातरजमा करून वैयक्तिक मान्यता प्रदान करत असतो.

संबंधित अपीलकर्त्यांने मूळ अर्जामध्ये नियुक्ती आदेश, ठराव व वैयक्तिक मान्यता याबाबतची मागणी केली होती. सदरची मागणी शाळा स्तरावरील असल्याने शाळेने माहिती देणे आवश्यक होते. मात्र द्वितीय अपीलाच्या सुनावणी दरम्यान मागितलेली उपलब्ध माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे. तथापि दि.०६.०४.२०२२ च्या चौकशी अहवालाची साक्षांकित प्रत पुनश्च सोबत सादर करण्यात येत आहे. कृपया स्विकार व्हावा, ही विनंती त्या अनुषंगाने आदेश पारीत होणेस विनंती आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता प्रस्तावित नोटीस खारीज करण्याबाबतची विनंती आहे.

उपरोक्त खुलाशाचे अवलोकन केले असता, तसेच दि.१२.०५.२०२२ रोजीच्या आदेशानुसार तत्कालीन मा.मुख्य माहिती आयुक्त यांच्या आदेशानंतर शाळेची व अपिलकर्ता यांची शिक्षिका म्हणून नेमणूक विषयासंबंधिची चौकशी करण्यात आली आणि त्यांच्या दि.०६.०४.२०२२ रोजीच्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्ता यांना समक्ष देण्यात आले असल्याचे नमूद करीत अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यांना प्रदान करण्यात आलेल्या चौकशी अहवालाची प्रत ही प्रस्तुत खुलाशासोबत जोडण्यात आली असून त्याचे अवलोकन केले असता प्रस्तुत तक्रार अर्ज हा तथ्यहीन असून निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

( राहुल भा. पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission Maharashtra

ठिकाण : मुंबई
दिनांक : ११.११.२०२५